मंद्रूप पोलीस स्टेशन मध्ये जमा असलेली बेवारस मोटरसायकल आणि पोलीस स्टेशनमधील CCTNS बॅटरी परस्पर घेवून जावून त्याचा गैरवापर करणाऱ्या सर्व संबंधितावर गुन्हे दाखल करण्याबाबत...

3 messages

Ganesh More <ganeshmoregm77@gmail.com> Mon, 21 Sept, 2026 at 10:05 am
To: CM@maharashtra.gov.in, dgpms.mumbai@mahapolice.gov.in, ig.kolhapurrange@mahapolice.gov.in, sp.solapur.r@mahapolice.gov.in, sdpo.solapur.divn@gmail.com, ps.mandrup@gmail.com

1) मा. मुख्यमंत्री तथा गृहमंत्री
महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई.

2) मा. पोलीस महासंचालक साहेब,
महाराष्ट्र राज्य.

3) मा.पोलीस महानिरीक्षक साहेब,
कोल्हापूर परिक्षेत्र.

4) मा.पोलीस अधीक्षक साहेब,
सोलापूर ग्रामीण सोलापूर.

5) मा. उपविभागीय पोलीस अधिकारी
सोलापूर ग्रामीण.

6) मा. प्रभारी अधिकारी
मंद्रूप पोलीस स्टेशन.

विषय - मंद्रूप पोलीस स्टेशन मध्ये जमा असलेली बेवारस मोटरसायकल आणि पोलीस स्टेशनमधील CCTNS बॅटरी परस्पर घेवून जावून त्याचा गैरवापर करणाऱ्या सर्व संबंधितावर गुन्हे दाखल करण्याबाबत...

मा. महोदय,

वरील विषयास अनुसरून मंद्रूप पोलीस स्टेशन मध्ये जमा असलेली बेवारस मोटरसायकल MH 13 BX 9548 सध्याचा (डुप्लिकेट नंबर) हिरो कंपनीची डीलक्स ही बेवारस मोटरसायकल दिनांक 5 जून 2026 ते 10 जून 2026 या कालावधीत पोलिस स्टेशन मधून शिपाई कामगार सोमनाथ मारुती शेजाळ, आणि शर्णप्पा कांबळे झीरो कर्मचारी यांनी त्रयस्थ पोलिस अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून संगनमताने मोटरसायकल गायब होती.

पोलीस स्टेशन मधील शासकीय मालमत्ता असणारी CCTNS बॅटरी सुद्धा त्याच त्रयस्थ पोलीस अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून दिनांक 25 जून 2026 ते 1 जुलै 2026 या कालावधीत पोलिस स्टेशन मधील शिपाई कामगार सोमनाथ मारुती शेजाळ, शर्णप्पा कांबळे, सुनील कोळी सफाई कामगार व प्रकाश जकूने उर्फ(शाक्या) या झीरो कर्मचाऱ्यांनी त्रयस्थ पोलिस अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून पोलिस स्टेशन मधून CCTNS बॅटरी गायब केली होती सदरील घटनेची परिसरात चर्चा झाल्यानंतर पोलीस प्रशासनाची बदनामी होत असताना वरील घटना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानावर गेल्यानंतर सोलापूर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज जगताप साहेब दिनांक 16 सप्टेंबर 2026 रोजी मंद्रूप पोलीस स्टेशन मध्ये आल्यानंतर सदरील घटनेची चौकशी करत असल्याचे समजल्यानंतर दिनांक 16 सप्टेंबर 2026 व दिनांक 17 सप्टेंबर 2026 या कालावधीमध्ये रात्रीच्या वेळी 13 मैल येथील प्रसाद शेट्टी यांच्या वैष्णवी हॉटेल येथे CCTNS बॅटरी आढळून आली आहे.

तसेच 17 सप्टेंबर 2026 रोजी रात्रीच्या वेळेस अज्ञात इसमाने सदरील बेवारस मोटरसायकल MH 13 BX 9548 (डुप्लिकेट नंबर) ही तीन महिन्यानंतर गुपचूप पोलीस स्टेशनमध्ये परत आणून लावली आहे आणि पोबारा केला आहे, त्यानंतर दिनांक 18 सप्टेंबर 2026 रोजी मोटरसायकल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवण्यात आलेली

आहे, व पोलीस स्टेशन मधील मुतारी समोर आणून लावण्यात आलेली आहे तसेच याच दिवशी सकाळी 7 ते 9 वाजण्याच्या दरम्यान 13 मैल येथील वैष्णवी हॉटेलच्या कर्मचाऱ्यांनी तीन महिन्यानंतर CCTNS बॅटरी परस्पर पोलीस स्टेशनमध्ये आणून ठेवली आहे.

सदरील मोटरसायकल MH 13 BX 9548 (डुप्लिकेट नंबर) ही तीन महिने विविध गुन्ह्यामध्ये वापरल्याचा स्थानिक नागरिकांचा संशय आहे, तसेच पोलीस स्टेशनमध्ये जमा असणारी बेवारस मोटरसायकल व पोलीस स्टेशनच्या मालकीची शासकीय मालमत्ता असणारी CCTNS बॅटरी या दोघांचा परस्पर गैरवापर झाल्याचे निदर्शनास येत आहे.

या घटनेमध्ये मंद्रूप पोलीस स्टेशन मधील अनेक अधिकारी व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या बेकायदेशीर कृत्य करणाऱ्याला सहकार्य केले आहे आणि मुख्य आरोपीला पाठीशी घालण्याचा व वाचवण्याचा प्रयत्न केलेला आहे , ही अतिशय गंभीर व निंदनीय बाब असून यामुळे पोलीस प्रशासनाची मोठ्या प्रमाणात बदनामी होत आहे.

रक्षकच कायद्याचे भक्षक झालेत का असा प्रश्न स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत, पोलिसांच्या कार्यपद्धतीवर शंका निर्माण होत आहे त्यामुळे आपण सदरील घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण तात्काळ संबंधित घटनेची निष्पक्षपने पडताळणी व चौकशी करून मंद्रूप पोलीस स्टेशन मध्ये जमा असलेली बेवारस मोटरसायकल आणि पोलीस स्टेशन मधील CCTNS बॅटरी परस्पर घेऊन जाऊन त्याचा गैरवापर करणाऱ्या व बेकायदेशीर गोष्टींना मदत करणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करून आम्हाला नैसर्गिक न्याय द्यावा ही विनंती.

गणेश मोरे
राष्ट्रीय छावा संघटना
तालुका अध्यक्ष दक्षिण सोलापूर
मनगोळी ता.द. सोलापूर- 413221
9822841448.

DGP Maharashtra <dgpms.mumbai@mahapolice.gov.in> Mon, 21 Sept, 2026 at 2:03 pm
To: SP MAHARASHTRA POLICE <sp.solapur.r@mahapolice.gov.in>
Cc: ganeshmoregm77 <ganeshmoregm77@gmail.com>

Respected Sir/ Madam,
Please see the forwarded mail. You are requested to take necessary action and inform the complainant/ sender accordingly.
The Complainant/ Sender is requested to get in touch with the unit to where the email has been forwarded for further follow up. The details of the unit is as follows.

Unit Name – "sp.solapur.r"
Email ID – <sp.solapur.r@mahapolice.gov.in>
Contact- https://www.mahapolice.gov.in/uploads/contact_email/dd35bfea79f9781e930f648165ed7a08.pdf

Thanks & Regards,
For DGP, M.S., Mumbai.

============ Forwarded message ============
From: Ganesh More <ganeshmoregm77@gmail.com>
To: <CM@maharashtra.gov.in>, <dgpms.mumbai@mahapolice.gov.in>, <ig.kolhapurrange@mahapolice.gov.in>,

<sp.solapur.r@mahapolice.gov.in>, <sdpo.solapur.divn@gmail.com>, <ps.mandrup@gmail.com>
Date: Mon, 21 Sep 2026 10:05:37 +0530
Subject: मंद्रूप पोलीस स्टेशन मध्ये जमा असलेली बेवारस मोटरसायकल आणि पोलीस स्टेशनमधील CCTNS बॅटरी परस्पर घेवून जावून त्याचा गैरवापर करणाऱ्या सर्व संबंधितावर गुन्हे दाखल करण्याबाबत...
============ Forwarded message ============
[Quoted text hidden]

Shri. Devendra Fadnavis (Chief Minister) <cm@maharashtra.gov.in> Mon, 21 Sept, 2026 at 3:05 pm
To: Manisha Milind Mhaiskar <acs.home@maharashtra.gov.in>
Cc: ganeshmoregm77 <ganeshmoregm77@gmail.com>

Dear Applicant,

Your email has been received by this office, This email is for appropriate action. The Home Department (022-22048130) has been sent. However, your email should be further investigated in the above department.

Hon. Chief Minister's Secretariat
Ministry, Mumbai

============ Forwarded message ============
From: Ganesh More < ganeshmoregm77@gmail.com >
To: < CM@maharashtra.gov.in >, < dgpms.mumbai@mahapolice.gov.in >, < ig.kolhapurrange@mahapolice.gov.in >, < sp.solapur.r@mahapolice.gov.in >, < sdpo.solapur.divn@gmail.com >, < ps.mandrup@gmail.com >
Date: Mon, 21 Sep 2026 10:05:37 +0530
Subject: Regarding filing of cases against all those involved in misusing the abandoned motorcycle and CCTNS battery stored in the Mandrup Police Station...
============ Forwarded message ============
[Quoted text hidden]